Impact Factor – 6.625 | Special Issue – 229 (C) | February 2020 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S
RESEARCH JOURNEY
Multidisciplinary International E-Research Journal
PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL

SPECIAL ISSUE 229 (C)

# भारतीय युवक : आव्हाने आणि संधी



- अतिथि संपादक -
डॉ. व्ही. आर. कोडापे

- मुख्य संपादक -
डॉ. धनराज टी. धनगर

- कार्यकारी संपादक -
डॉ. एन. एम. छंगाणी
प्रा. पी. एस. शिरसाट

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

# – अनुक्रमणिका –


1. राष्ट्रसंतांची ग्रामगीता आणि आजचा युवक ........ 1
डॉ. दिनेश किसनराव राऊत
2. माइंड ऑफ द यूथ एक आर्थिक सर्वेक्षण ........ 3
प्रा.डॉ. निलम एम. छंगाणी
3. वर्तमान युवकांची दशा आणि दिशा ........ 5
प्रा. डॉ. शाम रा. दुतोंडे
4. युवकांच्या विकासात राष्ट्रीय कौशल्य विकास उपक्रमाची भूमिका ........ 7
प्रा.डॉ. मधुकर श्रीराम ताकतोडे
5. आजच्या युवकांपुढील आदर्श व आव्हाने ........ 9
प्रा. गणेश दामोधर काकडे
6. आजचा युवक आणि राजकारण ........ 11
प्रा. पाटील व्यंकट इरवंतराव
7. स्वामी विवेकानंद आणि युवक ........ 13
प्रा. डॉ रविंद्र पुंडलिक झनके
8. 'आजचे मराठी साहित्य आणि युवक' ........ 16
डॉ.गजानन भाऊराव मुंधे
9. नवीन भारत घडविण्याकरिता स्वामी विवेकानंदाचे तरुणांनाआव्हान! ........ 18
डॉ. रमाकांत विठ्ठल ईटेवाड
10. युवा साहित्य संम्मेलन : काळाची गरज ........ 22
प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी,
11. वर्तमान काळात भारतीय संगीताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये इंटरनेट व सोशल मिडीयाची भूमिका ........ 24
प्रा.अमोल वासुदेवराव गावंडे
12. भारतीय युवकांच्या समस्या आणि उपाय ........ 26
डॉ. अर्चना देविलाल भैसारे
13. हिंसा दहशतवाद आणि युवक ........ 28
डॉ.देविदास श्रीराम भगत
14. नागरी भागातील युवकांच्या सामाजिक चळवळी आणि आव्हाने ........ 30
डॉ. दगडू नरसिंगराव दामावले
15. आजचे मराठी साहित्य आणि युवकांचे अनुबंध ........ 33
प्रा. दिलीप सुखदेवराव वानखडे
16. भारतीय युवकांमधील बेरोजगारीचे आव्हान व उपाय ........ 35
डॉ. गणेश बाबुराव दराडे
17. भारतीय राजकारणातील युवकांचा सहभागाचे अध्ययन ........ 37
डॉ. आर. डी. इंगोले
18. राष्ट्रीय सेवा योजना आणि युवक ........ 39
प्रा. राजेश हरीभाऊ माथुरकर
19. आजचे मराठी साहित्य आणि युवक ........ 41
रेखा चवरे
20. भारताचे राजकारण आणि युवा ........ 44
प्रा.डॉ. सुनिता प्र. मनवर

**RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal** **ISSN : 2348-7143**
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 229 (C) : भारतीय युवक : आव्हाने आणि संधी* **February 2020**

# राष्ट्रसंतांची ग्रामगीता आणि आजचा युवक

**डॉ. दिनेश किसनराव राऊत**
सहाय्यक प्राध्यापक
युवाशक्ती कला आणि विज्ञान महाविद्यालय, अमरावती, पिन कोड- ४४४ ६०६

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित ग्रामगीता उघडताच आपल्या दृष्टीस पडते कि,

*तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो सकळांचे लक्ष तुजकडे वळो ।*
*मानवतेचे तेज झळझळो विश्वामाजी या जोगे ।।*

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता ही शेतकऱ्याला अर्पण केली. त्यांचे लक्ष होते की, जगातील प्रत्येक श्रमिकाच्या कामाला प्रतिष्ठा मिळावी व त्याला त्याच्या श्रमाचा मोबदला मिळाला पाहिजे. आजच्या काळाचा विचार करता शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. शेतीच्या संदर्भात चिंतन होणे गरजेचे आहे.

आपला भारतदेश आधीपासूनच कृषिप्रधान देश आहे. भारत देशातील ७०% लोकांचा व्यवसाय शेती आहे. आपली शेती ही राम भरोसे होती म्हणजे आपली शेती निसर्गाच्या पाण्यावर आधरित आहे. नंतर ती काम भरोसे झाली. म्हणजेच घरातील सर्व सदस्य शेतीवर अवलंबून होते. आजही आहे. घरातील सर्व सदस्य शेतात जात व काबाळकष्ट करीत असत व आपला उदरनिर्वाह करत होते. परंतू आता काळ बदललेला आहे. आता ही शेती राम व काम भरोसे जरी असली तरी ती आता दाम भरोसे झालेली आहे. प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्याला पैसे मोजावे लागतात. परंतु त्याला त्याच्या श्रमाचा मोबदला मिळत नाही. भारत देशातील शेतीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येते.

१) **भूस्वामी जमिनदार :** हा शेतीचा पहिला प्रकार आहे. या प्रकारातील शेतकऱ्यांकडे ५०,००० एक्कर शेती आहे. त्याला जेवढी घरी कसायची आहे तेवढी ती कसतो. व उरलेली शेती तो इतरांना बटाईने लागवणीकरीता विशिष्ट मुदतीकरीता देतो. त्या प्रकारातील शेतकऱ्याला काही दिवसांनी आपल्याकडे किती शेती आहे यांचा अंदाजही नसतो. त्याला नफा किंवा तोटा झाला तर त्याला काही फरकही पडत नाही.

२) **श्रीमंत शेतकरी :** या शेतकऱ्यांकडे जमीन ५० एक्कर आहे. त्याच्याकडे मोटर सायकल, ट्रॅक्टर, चार चाकी वाहन चैनीच्या सर्वच वस्तू आहे. तो नेहमी पांढरे शुभ्र कपडे परिधान करतो. प्रतिष्ठीत वागणूक दाखवतो व श्रीमंतीचा आव आणत असतो. लोकांना जेवू घालणे, पुढे पुढे करणे यात पटाईत आहे. परंतु या सर्व वस्तू बँकेच्या सौजन्याने आहे.

३) **भांडवली शेतकरी :** या शेतकऱ्यांकडे फक्त ४ एक्कर शेती आहे. मात्र तो चार एक्करामध्येच ४ करोड रूपयांचे उत्पन्न वर्षाकाठी घेतो. तो फक्त शेतीमध्ये बियाणे तयार करतो व १०० ग्रॅम बियाणे ३०००/- रुपयाला विकतो. उदा. १ किलो झेंडूचे बी ९०००/- रू. ला विकतो.

४) **मध्यम शेतकरी :** या शेतकऱ्याकडे मोजकीच जमीन आहे. तो सर्व जमीन कोरडवाहू आहे. यांची संपूर्ण शेती ही राम भरोसे आहे. पाऊस झाला तर ठीक नाही तर त्याला शेती गहाण ठेवावी लागते. यावर हा शेतकरी चार महिने शेतीत राबतो व नंतर कामाकरीता भटकतो.

५) **सधन शेतकरी :** या शेतकऱ्याकडे शेती मोजकीच आहे. परंतु त्यामध्ये पाण्याचा साठा भरपूर आहे. हा शेतकरी स्वत:च्या शेतात राबतो. त्याच्या घरचे सर्व सदस्य ही शेतात राबतात व स्वत:च्या शेतातील काम करून इतरांच्या शेतातही ते राबतात. एकंदरीत हा शेतकरी सुखी आहे. समाधानी आहे.

६) **अल्पभूधारक शेतकरी :** या शेतकऱ्यांकडे कमी जमीन आहे. तो शेतात मोजकाच जातो व शेती सोबतच पुरक व्यवसाय करतो. या शेतकऱ्याला शेतीत काही उत्पन्न झाले नाही तरी तो आनंदात असतो व तो वेळप्रसंगी मध्यम शेतकऱ्यांची जमिन विकत घेत असतो.

वरील सर्व शेतीचा विचार करूनही आजची परिस्थितीवेगळीच आहे. आपण आपली शेती ५० किलोमीटर दूर राहुन मानसोमानसी करायला लागलो. प्रत्येक वस्तू आपल्याला दाम दुप्पट देवून विकत घ्यावी लागते आपण आपले गाव सोडून शहराकडे धाव घ्यायला लागलो. त्यामुळे आपली शेती ही तोट्यात आलेली आहे व शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची पाळी आलेली आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेमध्ये म्हणतात.

*ग्राममीता नव्हे पारायणासी । वाचता वाट दावी जनाशी ।।*
*समूळ बदली जीवनासी । मनी घेता अर्थ तिचा ।।६६।।*
*ही नव्हे फुले टाकण्यासाठी । ही ग्रामाची उध्दार दृष्टी ।*
*आजच्या युगाची संजीवनी बुटी। मानतो आम्ही ग्रामगीता ।।६७।।*

महाराज म्हणतात ग्रामगीता ही आजच्या युगाची संजीवनी बुटी आहे. म्हणजेच शेतकऱ्याला कोणतीही अडचण येत असेल तर त्या अडचणीचा उपाय ग्रामगीतेमध्ये महाराजांनी सांगीतलेला आहे. सामुहीकता हा ग्रामगीतेचा आत्मा आहे. त्यांनी एक गाव म्हणजे एक गट (युनिट) मानले आहे. सर्व गावातील लोकांनी प्रार्थनेला एकत्र जमावे व दरोजच्या झालेल्या कार्यावर चर्चा व्हावी. काही अडचणी आल्या असेल तर त्यावर चिंतन करून चर्चा करून मार्ग काढावा.

ISSN : 2348-7143
February 2020

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 229 (C) : भारतीय युवक : आव्हाने आणि संधी

असे महाराजांना अभिप्रेत आहे.

जागतिकीकरणामध्ये आपल्या देशातील मालाची निर्यात दुसऱ्या देशात व्हायला पाहिजे. व दुसऱ्या देशातील मालाची आयात आपल्या देशात व्हायला पाहिजे. परंतु आपल्या भारत देशात इतर देशातील माल आयात होतो. परंतु आपल्या देशातुन माल दुसऱ्या देशात निर्यात होतांना दिसत नाही व आपल्याकडील लहानमुले कुपोषणामुळे मरत आहेत. कारण आपल्या शेतीत उत्पन्न होत नाही. याचा अर्थ आपण ग्रामगीतेचे तत्व पाळत नाही असा होतो. तुकडोजी महाराज लिहितात.

*जे जे गावी भिन्न उद्योग । त्यांचा जुळवावा संयोग ।*
*ठराविक जागी नाना प्रयोग । चालवावे गावात ।।*
*काय नाही आपल्या गावी । याची चौकशी व्हावी ।*
*नसेल ती सजवावी । पुण्य वाटीका ग्रामाची ।।१०३।।*

गावातील सर्वांनी आपले हेवेदावे विसरून एकत्रीत यावे व संघटीत व्हावे तरूणांनी वृध्दांचे मार्गदर्शन घ्यावे. सर्वांनी कोणतेही एकच प्रकारचे उत्पन्न घ्यावे. सिंचनाचे सोय उपलब्ध करून घ्यावी, गावामध्ये शाळकरी मुले व वृध्द लोक राहतील व इतर सर्वजन आपली गावे सोडून शेतीमध्येच राहायला जातील. जेणेकरून जाण्या-येण्याचा वेळ वाचेल. सुर्योदयापूर्वीच सर्वांनी उठावे देवाचे ध्यान साधना करून दैनंदीनी प्रमाणे कामे करावी. सायंकाळी घरी आल्यानंतर संध्याकाळी सात वाजता एकत्रीत येवून प्रार्थना करावी व झालेल्या कार्याबद्दल चर्चा करावी.

शेतीला लागणारे बी-बियाणे, आपल्याच शेतात निर्माण करावे. शेतीला लागणारे सर्व शेतीची साधने आपल्याच गावात तयार करावी. शेतकऱ्याने कत्तलखाने बंद करून गोपालन करावे. त्यापासून खतनिर्मिती करावी, शेणखत शेतीला द्यावे, शक्यतोवर बैलांच्या साह्याने शेतीची कामे करावी. यंत्राने कामे केल्यास प्रदुषण होवू शकते, महाराज म्हणतात,

आपुली संपत्ती नसे आपुली । आपुली संततीही नसे आपुली ।।

म्हणजेच या संपूर्ण उत्पादनावर आपला सर्वांचा अधिकार असावा. आपल्याला जेवढे उदरनिर्वाहासाठी पाहिजे तेवढेच आपण घ्यावे व उरलेली संपत्ती ही गावाच्या विकासासाठी वापरावी. जोपर्यंत आपण मुलाला जन्म दिला तोपर्यंत त्यावर आई वडीलांचा अधिकार असावा. व नंतर ते मुल सर्व गावाचे मानले जावे. त्या मुलाच्या प्रगतीसाठी सर्वांनी हातभार लावावा. व मुलानेही पुर्ण शिक्षण घेतल्यानंतर गावाच्या विकासासाठी वर सांगीतल्या प्रमाणे संशोधन करून नवीन नविन शोध लावावे. परदेशात जावून दुसऱ्या देशाची चाकरी (गुलामगीरी) करू नये.

उदा. जनसारस्वत सुदाम सावरकर यांचे नातू इंजिनियर समिर सावरकर यांनी ग्रामगीतेच्या ध्येय धोरणाला अनुसरून टेली मिडीसिन सोलुशन नावाच्या उपकरणाचा शोध लावून त्याने आरोग्य विषयक चाचण्या आपल्याला घरी बसूनच करता येतात व त्यासाठी खर्चही फक्त केवळ ५ रूपये होऊ शकतो. तो खर्च ग्रामीण भागातील गरीब जनतेला परवडण्यासारखा आहे. या यंत्राचा वापर बिहार, ओरिसा, युपीमध्ये १५००० खेड्यांमध्ये राबविण्यात येत आहे. तसेच इंजिनिअर समीर सावरकर यांचा स्वित्झर्लंडच्या जागतिक संघटनेने त्यांच्या या संशोधनाबद्दल गौरवही केलेला आहे.

त्यांनी ग्रामगीतेच्या ध्येय धोरणाला अनुसरून शेतकऱ्याच्या हिताचे दुसरे एक उपकरण तयार केले व त्यामुळे पर्जन्यमान, आर्द्रता, वातावरणाचा दाब, तापमान, वाऱ्यांची दिशा, वेळ, सुर्यप्रकाशाचा व उर्जेचा कालावधी हा तपशील दर २० सेकंदाने नोंदविल्या जाते. त्यामुळे पिकांचे नियोजन, नियंत्रण व आपत्कालीन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व जमिनीचा कस लक्षात घेवून कोणत्या पिकाचे उत्पन्न काढता येतात याची माहिती मिळते.

ग्रामगीतेच्या ध्येय धोरणाला अनुसरून ग्रामीण जनतेसाठी ग्राम आरोग्य व ग्रामकृषी विकसित व्हावी म्हणून हे सर्व इंजिनिअर समीर सावरकरांनी चालविले आहे. त्यांचाच आदर्श इतर हूशार तरूणांनीही घ्यावा. व परदेशात जावून दुसऱ्या देशाची गुलामगिरी स्विकारण्यापेक्षा ग्रामगीतेतून प्रेरणा घेवून या देशातील जनतेसाठी विकास मार्गाचे शोध घेतले तर राष्ट्रसंतांच्या स्वप्नातील भारत उभा होण्यास काहीही वेळ लागणार नाही इतकी गुणी आणि सक्षम तरूणाई आपल्या देशात उपलब्ध आहे.

जागतिकीकरणामध्ये संगणकाच्या साह्याने मालाचे भाव आपल्याला इंटरनेटव्दारे माहिती होवू शकते व जो ग्राहक आणि शेतकरी आहे त्यांच्या मधील दलाल आहे त्याला येथे वाव मिळत नाही. व शेतकऱ्यांची पिळवणूक होण्यापासून तो सुटू शकतो. सर्व शेतकऱ्यांना त्याच्या त्याच्या श्रमातून मोबदला मिळतो.

आधुनिक शिक्षण पध्दतीमध्ये इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मराठी वाङ्मय अशा प्रकारचे कितीतरी विषय शिकविले जातात. परंतू त्यातून जीवनशिक्षण दिले जात नाही त्यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने आठ वर्षापासून राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा विषय सुरू केलेला आहे. त्यामध्ये जीवन शिक्षण दिले जाते. उद्योग कसा करावा, युवकांचे संघटन करून त्यांचे युनिट कसे करावे अशा प्रकारचे भारतातील ३५० विद्यापीठात हा विषय सुरू व्हावा. जेणेकरून जागतिकी करणाच्या नावावर जी सुशिक्षित बेरोजगारांची पिळवणूक होत आहे ती थांबविल्या जाईल. आजच्या काळाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीताच तारू शकते. तसेच साहित्यिकांनीही ग्रामगीतेच्या तत्वावर चिंतन करायला पाहिजे व ग्रामगीतेचे विचार वाचकांपर्यंत पोहोचवायला पाहिजे असे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखीत ग्रामगीता
२) ग्रामगीता रहस्य स्पंद : १ - लेखक डॉ. सुभाष सावरकर
३) ग्रामगीता रहस्य स्पंद : २ - लेखक डॉ. सुभाष सावरकर
४) जनक्रांतीची दिशा लेखक - डॉ. सुभाष सावरकर